**वि.दि.दा.क्र.९/२०१६**
**नि.क्र.१०५.**
**प्रतिवादी क्र.१ तर्फे साक्षीदार क्र.१**

**<u>प्रतिवादी क्र.१ तर्फे साक्षीदार क्र. १ स्वतः प्रतिवादी क्र.१ यांचा पुढील सरतपास वादी तर्फे एस. के. भोरे वकील यांच्या मार्फत शपथेवर सुरु</u> -**

मी माझे सरतपासात शपथपत्र नि.क्र. १०५ येथे दाखल केले आहे. त्यावर माझी सही आहे त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे.

सरतपास पूर्ण.

**<u>उलटतपास प्रतिवादी क्र. ४ ते ६, ८, ९ यांचेकडून</u>**

वारंवार पुकारा केला असता प्रतिवादी क्र. ४ ते ६, ८ व ९ व त्यांचे वकील गैरहजर

सबब, उलटतपास नाही.

**<u>उलट तपास वादी तर्फे व्ही.डी. पवार विधीज्ञ</u> -**

मी वादी, वादीच्या पतीला व त्यांच्या भावांना ओळखते. मी इतर प्रतिवादींना ओळखतो. मी दशरथ नाईकनवरे यांना ओळखतो. त्यांना प्रतिवादी क्र. ४ ते ६ व वादीचे पती अशी चार मुले नावे राम, राजेंद्र, हनुमंत आणि लक्ष्मण अशी आहेत. लक्ष्मणचे भाऊ राजेंद्र यांना माझी बहिणी दिलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, शालीनी व लक्ष्मण रत्नागीरी येथे शिक्षक म्हणुन कार्यरत आहेत. हे म्हणणे खरे आहे की, माझे व शालीनी व लक्ष्मण यांचे चांगले संबंध आहेत. आमचे क्वचीत येणे-जाणे होते. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत सर्वे नंबर ३६४ ही प्रतिवादी क्र.४ ते ६ व वादीचे पती यांची वडीलोपार्जीत मिळकत आहे. हे म्हणणे खरे आहे की, सर्वे नंबर ३६४ मधील काही जमीन प्रतिवादी क्र.५ यांनी प्रमोद आधटराव यांना विकली. हे मला माहित नाही की, त्यामधील काही जमीन प्रतिवादी क्र.८ यांना देखील विकली किंवा कसे. (साक्षीदार पुन्हा सांगतो की, परंतु त्याबाबत मी ऐकून आहे.) हे मला माहित नाही की, प्रतिवादी क्र.५ राजेंद्र यांनी प्रमोद व शिवाजी यांना विकलेली जमीनी आडत म्हणुन बिगर हक्काच्या विकल्या होत्या किंवा कशा. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.५ यांनी प्रमोद व शिवाजी यांना जमीन विकण्या आधी त्या जमीनीवर प्रतिवादी क्र.५ यांचा ताबा होता. हे मला माहित नाही की, त्या जमीनी विकल्यानंतर देखील त्यावर प्रतिवादी क्र.५ यांचा ताबा होता किंवा कसे. हे मी ऐकून आहे की, प्रतिवादी क्र. ४ राम नाईकनवरे यांनी गट नंबर ३६४ पैकी काही जमीन बिभिषण गोरे यांना विकल्या होत्या. हे मला माहित नाही की, त्या जमीनी पुन्हा वादी व वादीच्या पतीने बिभिषण गोरे यांच्याकडून घेतल्या किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, गट नंबर ३६४ मधील ०२ हेक्टर जमीन मी माझ्या

पत्नीच्या नावे प्रतिवादी क्र. ७ कडून विकत घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, त्या ०२ हेक्टरमधील ०१ हेक्टर जमीन माझ्या स्वत:च्या नावे करुन घेतली. हे म्हणणे खरे आहे की, सदर एकुण ०२ हेक्टर जमीन ही एकमेकाला लागुन एक-एक हेक्टर अशी आहे. मला सदर ०२ हेक्टर जमीनीच्या चतु:सिमा सांगता येणार नाहीत. आता मला मी न्यायालयाला पाठविलेले वस्तु क्र. **अ** दाखविण्यात आले. ते मीच पाठविलेले आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. (या ठिकाणी सदर वस्तु क्र. अ ला निशाणी देण्याची विनंती वादीतर्फे करण्यात आली परंतु सदर वस्तु क्र. **अ** वरील पत्र प्रतिवादींनी परस्पर न्यायालयाला पाठविले असल्यामुळे त्यास निशाणी देता येणार नाही असे प्रतिवादी क्र.१ च्या वकीलांनी न्यायालयाला सांगितले. माझ्या मते सदर वस्तु क्र. **अ** ला यावेळेपुरते निशाणी देवून सदर वस्तु क्र. **अ** ची पुराव्यामध्ये स्वीकार्यता व प्रासंगिकता याचा विचार अंतिम युक्तीवादा वेळी करणे न्यायोचित ठरणार आहे. त्यामुळे सदर वस्तु क्र. **अ** वरील पत्रास **निशाणी क्र. १०६** देण्यात येते.) हे म्हणणे खरे आहे की, सदर **निशाणी क्र.१०६** ची एक प्रत मी वादी व भोरे वकील यांना पाठविली होती.

माझे शिक्षण बी.ए. पार्ट सेकन्ड इतपर्यंत झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी जिवन विम्याचे काम करत होतो. हे म्हणणे खरे नाही की, जिवन विम्याचे काम केले असल्यामुळे मला न्यायालयाच्या प्रक्रियेची माहिती आहे. मी माझ्या वकीलांना दाव्याची कैफियत देते वेळी निशाणी क्र.१०६ मधील मजकुराविषयी माहिती दिली नव्हती. या कामी माझ्यातर्फे दिलेली कैफियत ही माझ्या सांगण्याप्रमाणेच दिली आहे किंवा कसे हे मला आठवत नाही.

हे म्हणणे खरे आहे की, गट नंबर ३६४ मधील माझ्या व माझ्या पत्नीच्या नावे असलेली जमीन आम्ही आर्थीक अडचणीपोटी तसेच वहिवाटीला लांब असल्यामुळे विकायला काढली होती. हे म्हणणे खरे नाही की, सदरची जमीन शालीनी व लक्ष्मण यांनी विकत घ्यावी असे मला वाटत होते. हे म्हणणे खरे नाही की, सदरची जमीन विक्री करण्याबाबत माझ्यात व शालीनी तसेच लक्ष्मण यांच्यामध्ये चर्चा झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, लक्ष्मण व शालीनी यांनी सदरची जमीन विकत घेण्याचे ठरविले होते. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक २५.१०.२०१५ रोजी लक्ष्मण अंतरगाव येथे आले होते तसेच मी व माझी पत्नी देखील अंतरगाव येथे आलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २५.१०.२०१५ रोजी अंतरगाव येथे मी, माझी पत्नी तसेच रामदास नाईकनवरे, अंबादास गोरे, तात्यासाहेब गोरे, उध्दव गोरे, सुधीर गोरे व रामचंद्र गोरे यांची दावा मिळकतीच्या विक्रीबाबत बैठक झाली. हे म्हणणे खरे नाही की, राम नाईकनवरे यांच्या घरामध्ये सदरची बैठक झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, तसा ठराव झाला होता व त्या ठरावामध्ये रक्कम रुपये ६,५०,०००/- एवढया रक्कमेमध्ये ०२ हेक्टर जमीनीचा व्यवहार ठरला होता. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०९.११.२०१५ रोजी इसारापोटी रक्कम रुपये ४,००,०००/- माझ्या खाती जमा झाली होती. हे म्हणणे खरे आहे की,

सदरची ४,००,०००/- रक्कम माझ्या स्टेट बँक खात्यामध्ये जमा झाली होती. हे मला माहित नाही की, सदरची ४,००,०००/- रक्कम कशा प्रकारे मला पाठविली होती. हे मला माहित नाही की, सदरची रक्कम वादी शालीनी हिने माझ्या खात्यावर वर्ग केली होती किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १८.११.२०१५ रोजी खरेदीखत करण्याचा ठराव झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १८.११.२०१५ रोजी मी व माझी पत्नी अंतरगाव व भुम येथे आलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, त्यादिवशी वादी शालीनी व तिचे पती देखील आले होतो. मी वादीचे भाऊ संजय बोराडे यांना ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १८.११.२०१५ रोजी संजय बोराडे, राम नाईकनवरे व सोमनाथ साबळे देखील अंतरगाव व भुम येथे आले होते. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १८.११.२०१५ रोजी मी जमीनीचा सातबारा काढुन आलो होतो. हे मला माहित नाही की, खरेदीखत हे संजय कवडे यांच्याकडून तयार करुन घेण्याचे ठरले होते किंवा कसे. हे मला माहित नाही की, त्यावेळी खरेदीखताची सर्व प्रक्रिया पुर्ण केली होती किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक १८.११.२०१५ रोजी माझे सासरे आजारी पडले असे मला कळाले होते. हे म्हणणे खरे नाही की, सासरे आजारी पडलेमुळे आम्ही खरेदीखत नंतर करु असे म्हणुन निघुन गेलो. हे म्हणणे खरे आहे की, ९३२३०४७०७२ हा मोबाईल नंबर माझा होता. हे म्हणणे खरे नाही की, वादी व तिच्या पतीने त्यांचा मोबाईल क्रमांक ९८९०५४१५३६ या नंबरवरुन वरील माझ्या मोबाईल नंबर वर फोन करुन खरेदीखत करुन देण्याच्या संदर्भात मला विचारणा केली. हे म्हणणे खरे नाही की, वादी व वादीच्या पतीने माझ्या सास-याच्या तब्येतीसाठी फोन केला होता. हे म्हणणे खरे नाही की, वादी व वादीच्या पतीने खरेदीखता संदर्भात मला एसएमएस देखील केले होते व त्याचे रेकॉर्डींग वादीकडे आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मी वादींना माझ्या सास-यांची प्रकृती ठिक झाल्यावर खरेदीखत करु असे म्हणालो होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी वादींना मार्च महिन्यामध्ये खरेदीखत करुन देतो असे म्हणालो होतो. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे वादीने माझ्या बोलण्यावर विश्वास ठेवला होता. हे मला माहित नाही की, दिनांक १०.०३.२०१६ रोजी मी वादीला अंधारात ठेवून सदरची मिळकत प्रतिवादी क्र.३ ला खरेदी देऊ लागलो असे राम नाईकनवरे यांना कळाले. हे मला माहित नाही की, राम नाईकनवरे यांनी वादीला त्याबाबत सांगितले होते किंवा कसे. हे मला माहित नाही की, मी प्रतिवादी क्र.३ ला खरेदीखत करुन देताना त्या खरेदीखताबाबत राम नाईकनवरे यांनी तक्रारी अर्ज दिला होता किंवा कसे. हे मला माहित नाही की, तसा तक्रारी अर्ज देण्याचे वादी यांनी राम नाईकनवरे यांना सांगितले होते किंवा कसे. आता मला निशाणी क्र. ९९ वरील तक्रारी अर्ज दाखविण्यात आला. तो तक्रारी हा राम नाईकनवरे यांनी दिलेला असेल. हे म्हणणे खरे नाही की, सदर तक्रारी अर्जावर निबंधक यांनी सुनावणी घेतली होती. हे म्हणणे खरे नाही की, राम नाईकनवरे यांनी मला व प्रतिवादी क्र.३ ला आधिच व्यवहार झाला असल्यामुळे पुन्हा व्यवहार करु नका असे सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी ठरावाचा भंग करुन चुकीच्या पध्दतीने

प्रतिवादी क्र. ३ ला जमीन विक्री केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादी व वादीचे पती मला खरेदीची रक्कम द्यायला केंव्हाही तयार होते. (साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, वादी व वादीच्या पतींनी पुढल्यावर्षी डिसेंबरला खरेदी करु असे मला सांगितले होते.) हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादी क्र.३ ला ज्या दिवशी जमीन विक्री केली त्यादिवशी वादी व वादीच्या पतींनी मला फोन करुन राहिलेली रक्कम २,५०,०००/- देवून खरेदी घेण्याची तयारी दर्शविली होती व त्यावर मी देखील त्यांना असे सांगितले होते की, मी प्रतिवादी क्र.३ ला जमीन विक्री करत आहे ही तुम्हाला खोटी माहिती मिळालेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादींनी मला, माझ्या पत्नीला व प्रतिवादी क्र.३ ला नोटिस पाठविली होती. हे म्हणणे खरे नाही की, वादींनी मला फोन केला होता व मी वादीला ११.०३.२०१६ रोजी खरेदी करायला या असे सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ११.०३.२०१६ रोजी वादी रजा टाकुन खरेदीची उर्वरीत रक्कम सोबत घेवून व कागदपत्रे सोबत घेवून खरेदीसाठी तयार होती. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ११.०३.२०१६ रोजी वादींनी दुपारी ४.३० वाजेपर्यंत खरेदी ऑफीसला माझी वाट पाहिली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मी खरेदी ऑफीसमध्ये उशीला आलो होतो. (साक्षीदार स्वत:हुन सांगतो की, त्यादिवशी वादी व आठ ते दहा जण तात्यासाहेब गोरे यांच्या घरी हजर होते.) हे म्हणणे खरे नाही की, त्यादिवशी इंटरनेट बंद झाल्यामुळे दिनांक १२.०३.२०१६ रोजी खरेदीखत करण्याचे ठरले होते. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १२.०३.२०१६ रोजी वादींनी मला फोन केला परंतु मी फोन उचलला नाही. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १२.०३.२०१६ रोजी वादीला मी त्यांची फसवणुक केल्याचे कळाले. हे म्हणणे खरे नाही की, १२.०३.२०१६ रोजी वादीला मी व माझ्या पत्नीने ठरावाचा भंग करुन फसविले. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. ३ सोबत केलेले खरेदीखत चुकीचे असल्यामुळे ते रद्यबातल करण्यास पात्र आहे. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत खरेदी घेण्याचा हक्क केवळ वादीला आहे.

हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत ही वादीच्याच कब्जेत होती व आजही आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यात व प्रतिवादी क्र.१ व २ यांच्यामध्ये कोणताही करार झालाच नाही हे मी खोटे सांगत आहे. हे मला माहित नाही की, वादीने मला नोटिस पाठविली होती किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, वादीने दिराच्या जमीनी बळकावण्याचे प्रयत्न केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीने आधटराव याला धमकी दिल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या कैफियतीमध्ये व सरतपास शपथपत्र परिच्छेद क्र.१७ मध्ये आधटराव याबाबत लिहीलेला मजकुर ही माझी ऐकीव माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या कैफियत व सरपास शपथपत्र यातील परिच्छेद क्र.१८ व १९ मधील मजकुर खोटा लिहीलेला आहे. मी वादी विरुध्द तिने माझा छळ कपट केल्याबाबत पोलीस स्टेशनला तक्रार दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी नोटिसला चुकीचे व खोटे उत्तर दिले आहे.

निशाणी क्र.१०६ मधील मजकुर माझ्या कैफियतमध्ये का नमूद नाही याचे कारण मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत प्रकरणाबाबत मी ब-याच निष्णात वकीलांशी चर्चा केली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या वकीलांनी प्रकरण माझ्या विरोधात जाणार आहे म्हणुन मला किमान जास्त पैशे मिळावेत या हेतून सल्ला देवून त्याप्रमाणे मी निशाणी क्र.१०६ वरील पत्र न्यायालयाला लिहीले. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

उलत तपास पूर्ण.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत

AMOGH PRABHAKAR KULKARNI
Digitally signed by AMOGH PRABHAKAR KULKARNI
Date: 2025.02.12 16:37:31 +0530

ठिकाण - भूम.
(ए. पी. कुलकर्णी )
दिनांक – १२/०२/२०२५.
सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर,भूम.